दैनिक
अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज
मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार
# रायगड नगरी
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित
● वर्ष १७ वे ● अंक २४९ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शुक्रवार दि.९ डिसेंबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## स्कूल व्हॅनला शाळा संमती पत्र देणार

### समन्वय बैठकीमध्ये मुख्याध्यापक व प्रतिनिधींची सकारात्मक भूमिका

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**गेल्या काही महिन्यांपासून स्कूल व्हॅन परवाना आणि शाळा संमती पत्र बाबत निर्माण झालेला पेच जवळपास सुटला आहे. गुरुवारी को.ए.सो.व्ही. के.हायस्कूल या ठिकाणी पार पडलेल्या समन्वय बैठकीमध्ये परिवहन आणि शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी शाळांना शासन निर्णयाची जाणीव करून दिली त्यानंतर उपस्थित स्कूल प्रतिनिधींनी संमती पत्र देण्याबाबत सकारात्मक भूमिका घेतली. त्यामुळे यापुढे सुरक्षित विद्यार्थी वाहतूक करणे शक्य होणार आहे.**



पनवेलच्या शहरी भागामध्ये खाजगी शैक्षणिक संस्थांचे जाळे आहे. या ठिकाणी लाखो विद्यार्थी शिक्षण घेतात. स्कूल बसेस बरोबरच विद्यार्थी व्हॅनव्दारे शाळेत विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने ने आण केली जाते. सात प्लस एक अशी आसन क्षमता असणाऱ्या स्कूल व्हॅनची नव्याने नोंदणी बंद करण्यात आली आहे. परंतु पंधरा वर्षे कालमर्यादा असणाऱ्या या वाहनांचे परवाने नूतनीकरण करणे बंधनकारक आहे. परंतु त्याकरता शाळांचे संमतीपत्र आवश्यक असल्याने पनवेल परिसरातील ७०० स्कूल व्हॅन विनापरवाना विद्यार्थ्यांची वाहतूक करीत आहेत. विद्यार्थ्यांच्या सुरक्षितेच्या दृष्टिकोनातून ही बाब अत्यंत गंभीर झाली होती. पनवेल विद्यार्थी वाहक संस्थेने या संदर्भात परिवहन विभाग आणि शाळा व्यवस्थापनाकडे सातत्याने पाठपुरावा केला. शाळांमध्ये परिवहन समितीच्या बैठका आयोजित करण्यात आल्या. पनवेल आरटीओ च्या अधिकाऱ्यांनी सुद्धा शाळांना संमती पत्र देण्याबाबत सूचित केले. त्याचबरोबर शिक्षण विभागाने सुद्धा स्कूल व्हॅन चालकांना परवान्यासाठी संमती पत्र देण्याबाबत शाळा व्यवस्थापनाला आदेश निर्गमित केले होते. तरीसुद्धा त्यांच्याकडून टाळाटाळ केली जात होती. स्कूल व्हॅन परवाने आणि संमती पत्र या कायद्याच्या कचाट्यात विद्यार्थ्यांची सुरक्षित वाहतूक अडकली होती. हा प्रश्न निकाली निघत नसल्याचे पाहून पनवेल विद्यार्थी वाहक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष पांडुरंग हुमणे यांनी ६ डिसेंबर रोजी आमरण उपोषणाचा इशारा दिला होता. मात्र याबाबत प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून सकारात्मक भूमिका घेतली गेल्याने उपोषण दोन दिवस पुढे ढकलण्यात आले. मात्र या दिवशी लाक्षणिक बंद पुकारून आपल्या मागण्यांकडे पनवेल विद्यार्थी वाहकांनी सर्वांचेच लक्ष वेधून घेतले. गुरुवारी पनवेल येथे समन्वय बैठक संपन्न झाली. यावेळी शिक्षका आमदार बाळाराम पाटील, प्रादेशिक परिवहन अधिकारी अभय देशपांडे, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी अनिल पाटील, जिल्हा शिक्षण अधिकारी जोत्सना पवार- शिंदे पनवेल महापालिकेचे अधिकारी गणेश शेट्टे, पनवेल विद्यार्थी वाहक संस्थेचे सल्लागार हरीश बेकावडे, अध्यक्ष पांडुरंग हुमणे,उपशिक्षणाधिकारी सचिन पवार, सचिन विधाते, गटशिक्षण अधिकारी सिताराम मोहिते, माजी नगरसेवक गणेश कडू, विष्णू जोशी, शाळेचे मुख्याध्यापक प्रतिनिधी त्याचबरोबर विद्यार्थी वाहकांचे प्रतिनिधी उपस्थित होते

### अधिकाऱ्यांचे शासन निर्णयावर बोट!

संमती पत्र न मिळाल्याने स्कूल व्हॅन परवान्याचे नूतनीकरण रखडले होते. त्यामुळे विनापरवाना विद्यार्थ्यांची वाहतूक सुरू आहे. सुरक्षेच्या दृष्टिकोनातून ही बाब अत्यंत गंभीर असतानाही शाळांकडून संमती पत्र देण्यास टाळाटाळ केली जात होते. पनवेल विद्यार्थी वाहक संस्थेने पांडुरंग हुमणे यांच्या नेतृत्वाखाली उपोषण आणि आंदोलनाचे हत्यार उपसताच प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेल आणि जिल्हा शिक्षण विभागाने हा प्रश्न गांभीर्याने घेत तातडीची संयुक्त बैठक बोलावली. या विभागाच्या अधिकाऱ्यांनी शासन निर्णयावर बोट ठेवत संमती पत्र देणे शाळांना कसे बंधनकारक आहे याची माहिती दिली. जर याबाबत टाळाटाळ करण्यात आली तर कायदेशीर कारवाईचा इशारा शिक्षण विभागाकडून देण्यात आला. त्यानुसार शाळांकडून संमती पत्र देण्याबाबत सकारात्मक भूमिका घेण्यात आली.

### आ.बाळाराम पाटील यांची शिष्टाई

शिक्षक आमदार बाळाराम पाटील यांनी या मुद्द्यावर मध्यस्थी आणि शिष्टाई केल्याने आमरण उपोषण टळले. त्याचबरोबर आंदोलनाची तीव्रता सुद्धा कमी झाली. त्यांनी पनवेल प्रादेशिक परिवहन कार्यालय, शिक्षण विभाग आणि पनवेल विद्यार्थी वाहक संस्था यांच्यात समन्वय साधून हा प्रश्न मार्गी लागण्याच्या अनुषंगाने प्रयत्न केले. परिवहन आयुक्तांशी सुद्धा त्यांनी चर्चा केली. त्यानुसार स्कूल व्हॅन परवाने आणि संमती पत्र देण्याबाबतचा प्रश्न अंशतः मार्गे लागला आहे.

## हक्काच्या रेल्वेसाठी पेणकरांचे ११ डिसेंबरला रेल रोको आंदोलन

**दै.रायगड नगरी । पेण**

**कोकण रेल्वेसाठी रायगड जिल्ह्याचे मध्यवर्ती ठिकाण असलेल्या पेण तालुक्यातील शेकडो शेतकऱ्यांनी आपली सुपीक जमीन राष्ट्रहीता करीता रेल्वेला दिली आहे. त्यातील अनेक भुमीपुत्र आजही रेल्वेच्या नोकरी पासून वंचित तर आहेतच मात्र तालुक्यातील नागरिकांची रेल्वे प्रवासाची उत्तम सोय होईल अशी खात्री देखील होती. परंतु रेल्वे प्रशासना कडून कायमच पेणकरांवर अन्याय करण्यात येत आहे. आता पेण तालुक्यातील नागरिकांना हक्काची रेल्वे मिळावी यासाठी त्रस्त रेल्वे प्रवाशांनी माझं पेण संघटनेच्या नेतृत्वाखाली ११ डिसेंबरला रेल रोको आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.**




माझं पेण सामाजिक क्षेत्रातील अग्रेसर संघटना असून या संघटनेमार्फत पेण तालुका परिसरातील जनसामान्यांच्या ज्वलंत समस्यांना वाचा फोडण्याचे काम केले जाते. पेण-दिवा-पेण हि सकाळी ७:३० वाजताची मेमू रेल्वे रोह्याला पळविल्याने पेणकरांच्या नशिबी पुन्हा उभ्याने प्रवास करण्याची वेळ आली आहे. पेण-दिवा-पेण मेमू रेल्वे पूर्वीप्रमाणे सुरू करून तिच्या फेऱ्या वाढवाव्यात. कमीत कमी दहा एक्सप्रेस गाड्या पेणला थांबवाव्यात. रोहेकरांना त्यांच्या मागणीप्रमाणे नवीन दिवा-रोहा-दिवा रेल्वे उपलब्ध करून द्यावी. दिवा-सावंतवाडी-दिवा या रेल्वेला पेण येथे थांबा मिळावा. महाग केलेले रेल्वे तिकीट पूर्ववत करावे. या व इतर काही मागण्यांकरिता माझं पेण व प्रवासी सन्मान समिती यांनी वरिष्ठ रेल्वे कार्यालयांना व पेण रेल्वे स्टेशन मास्टर यांना पत्र दिले आहे.

**मागण्या येत्या १० डिसेंबर २०२२ पर्यंत पूर्ण न झाल्यास ११ डिसेंबर २०२२ रोजी माझं पेण संघटना व रेल्वे प्रवासी सन्मान समिती रेल रोकोचे जन आंदोलन करेल, असा इशारा माझं पेण संघटनेकडून देण्यात आले आहे. आंदोलनाची जोरदार तयारी सुरू असल्याची माहिती संघटनेचे अध्यक्ष राजेंद्र पाटील व प्रवासी संघटनेचे अध्यक्ष रितेश शहा यांनी दिली.**

## 'खारघर मॅरेथॉन' स्पर्धेच्या पूर्वतयारी व नियोजनासंदर्भात शुक्रवारी खारघरमध्ये बैठक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

धावपटू आणि क्रीडा रसिकांसाठी पर्वणी तसेच नवी मुंबईतील सर्वात मोठी असलेली 'खारघर मॅरेथॉन' स्पर्धा जानेवारी २०२३ मध्ये होणार आहे.

यंदाची हि १३ वी मॅरेथॉन स्पर्धा असून त्या अनुषंगाने पूर्व तयारी व नियोजनसंदर्भात शुक्रवार दिनांक ०९ डिसेंबर रोजी सायंकाळी ०७ वाजता खारघर येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सच्या सौजन्याने खारघरमध्ये भव्य स्वरूपात मॅरेथॉनचे आयोजन केले जात आहे. या स्पर्धेचे उत्तम व नीटनेटके नियोजनामुळे खारघर मॅरेथॉन नेहमीच यशाची शिखरे पार करीत आली आहे.ही फक्त मॅरेथॉन नसून खारघर, पनवेल सह नवी मुंबई, रायगडची शान आहे. त्यामुळे या मरेथॉनचे सर्वांना वेध लागलेले असतात.


KHARGHAR MARATHON

मानाची आणि खेळाचा गौरव असलेल्या या मॅरेथॉनच्या आयोजनात कोणतीही कसर राहू नये, यासाठी वेळोवेळी स्पर्धा नियोजनाचा आढावा घेतला जातो, त्यानुसार या बैठकीचे आयोजन करण्यात आले असून या बैठकीस सर्व समिती पदाधिकारी, क्रीडा रसिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सचे व्यवस्थापकीय संचालक तथा खारघर मॅरेथॉन स्पर्धा प्रमुख परेश ठाकूर यांनी केले आहे.

## आ.आदित्य ठाकरे यांच्या हस्ते राज्य अजिंक्यपद खो-खो स्पर्धेचे उद्घाटन

**दै.रायगड नगरी । रोहा**

शरदचंद्रजी पवार यांच्या ८२ व्या वाढदिवसाचे औचित्य साधून ४८ वी कुमार व मुली राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धेचे उद्घाटन युवासेना नेते आमदार आदित्य ठाकरे यांच्या हस्ते पार पडले. कुमार गट सातारा विरुद्ध औरंगाबाद, जळगाव विरुद्ध उस्मानाबाद आणि मुलींचा पुणे विरुद्ध जळगाव या संघांमध्ये आदित्य ठाकरेंच्या हस्ते टॉस उडविण्यात आला.



उद्घाटनप्रसंगी आदित्य ठाकरेंनी बोल-ताना, आज आनंदाची गोष्ट आहे, एका मैदानी खेळासाठी मला रोह्यात बोलावले आहे. मैदान कोनसा भी हो, साथ मे रहने का और जीतने का।. अनिकेतजी, आपण मोठी स्पर्धा भरवत आहात, यासाठी मोठी मेहनत घेतली आहे. मी मुंबई जिल्हा फुटबॉल संघटनेचा अध्यक्ष आहे. अशी मोठी स्पर्धा भरवताना येणाऱ्या मोठ्या जबाबदारीची मला जाणीव आहे. मैदानी खेळासाठी गावागावातून मुलं-मुली येथे येतात, त्यांच्यासाठी व्यासपीठ उपलब्ध केले ही खूप मोठी गोष्ट आहे. मुंबईत मातीची मैदानं आर्टिफिशियल बनत आहेत. मातीचा सुगंधच वेगळा, मातीत खेळण्याची मजा वेगळी.. म्हणून मातीची मैदानं टिकली पाहिजेत. क्रिकेट या खेळाचा प्रसार झाला कारण या खेळाचे एडमिनिस्ट्रेशन गावोगावी आहे. गावातील मुले मुली या खेळात पुढे आली आणि आपण जगात क्रिकेट खेळात एक नंबर बनलो. देशाला एकत्र आणण्याचे काम खेळ करतो. नेल्सन मंडेला यांनी फुटबॉल खेळाच्या माध्यमातून दक्षिण आफ्रिका देश एकत्र आणला आणि देश स्वतंत्र झाला.

या स्पर्धेतून कुमार आणि मुलींची निवड चाचणी होणार आहे आणि या निवड चाचणीतून महाराष्ट्राच्या संघाचा झेंडा तुमच्या हातात येणार आहे. महाराष्ट्रासाठी मेडल आणण्याची जबाबदारी तुमच्यावर आहे. राज्य अजिंक्यपद खो-खो स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी मला तारीख विचारण्यात आली, त्यावेळी मी सांगितले.. तुम्ही सांगाल त्या तारखेला मी येणार आहे. मी आज महाराष्ट्रासाठी आणि आपल्या मातीसाठी चांगले करण्याच्या भाव-नेतून इथे आलो आहे. शेवटी सर्व स्पर्धकांना त्यांनी शुभेच्छा दिल्या.

## संपत्तीचा वादातून बॅटने मारहाण करत आईला संपवले

### माथेरानच्या पायथ्याशी दरीत मृतदेह फेकला

**दै.रायगड नगरी । माथेरान**

वीणा यांचा मोठा मुलगा अमेरिकेत स्थायिक असून त्या धाकटा मुलगा सचिन याच्यासोबत राहतात. मात्र त्यांच्यात संपत्तीवरून सतत वाद होत असून हे प्रकरण कोर्टात गेल्याचेही पोलिसांना समजले.

संपत्तीच्या वादात पोटच्या पोराने वृद्ध आईला बेसबॉल बॅटने मारहाण करत संपविले. त्यानंतर तिचा मृतदेह खोक्यामध्ये भरून नोकराच्या मदतीने रायगडच्या दरीत नेऊन फेकला. वीणा गोवर्धनदास कपूर (७४) असे मयत महिलेचे नाव आहे. याप्रकरणी जुहू पोलिसांनी त्यांचा धाकटा मुलगा सचिन कपूर आणि नोकर छोटू ऊर्फ लालकुमार मंडह यांना अटक केली आहे. जुहू पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ६ डिसेंबर रोजी रात्री साडे दहाच्या सुमारास जुहूच्या गुलमोहर रोड क्रमांक ५ येथील गरीबदास सोसायटीमध्ये (कल्पतरू सोसायटी) राहणाऱ्या वीणा या हरवल्या असल्याची तक्रार सिक्युरिटी सुपरवायझर म्हणून काम करणारे जावेद अब्दुला मापारी यांनी केली. त्यानुसार हरवल्याची तक्रार ७ डिसेंबर रोजी दाखल करत जुहू पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अजित वर्तक यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक पवार, उपनिरीक्षक नरवडे यांनी तपास सुरू करत घटनास्थळी धाव घेतली. चौकशीदरम्यान मापारी यांनी पोलिसांना सांगितले की, वीणा यांचा मोठा मुलगा अमेरिकेत स्थायिक असून त्या धाकटा मुलगा सचिन याच्यासोबत राहतात. मात्र त्यांच्यात संपत्तीवरून सतत वाद होत असून हे प्रकरण कोर्टात गेल्याचेही पोलिसांना समजले. तेव्हा संशय आल्याने पोलिसांनी वीणा व सचिन यांचे मोबाईल लोकेशन तपासले. तेव्हा वीणा यांचे जुहू तर सचिन याचे लोकेशन पनवेल दाखवले. त्यानंतर सोसायटीच्या सीसीटीव्ही फुटेजमध्ये ७ डिसेंबरला सकाळी ७ वाजता सचिन आणि छोटू ऊर्फ लालकुमार मंडह हे माउली इमारतीच्या फ्लॅट २०३ मध्ये आल्याचे आढळले.

दोघांनाही चौकशीसाठी पोलिस ठाण्यात आणले असता सचिनचे त्याची आई वीणा यांच्याशी संपत्तीच्या वादातून भांडण झाले आणि त्याने हाताने व बेसबॉल बॅटने मारहाण करून त्यांची हत्या केल्याचे कबूल केले. तसेच नोकर छोटू याच्या मदतीने पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने वीणा यांचा मृतदेह एका मोठ्या खोक्यामध्ये भरून रायगड जिल्ह्यातील माथेरान येथे दरीमध्ये फेकल्याची कबुली दिली. त्यानुसार त्याच्यावर भादंवि कलम ३०२, २०१, ३४ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## बँक ऑफ इंडिया पेण शाखेत शॉर्ट सर्किटमुळे भीषण आग

**दै.रायगड नगरी । पेण**

पेण शहरात असलेल्या बँक ऑफ इंडिया शाखेच्या वरच्या विभागात बुधवारी रात्री उशिरा अचानक आग लागल्याने सर्वत्र धुराचा लोट पसरल्याने परीसरात एकच खळबळ उडाली होती. पेण नगरपालिकेच्या अग्निशमन दलाच्या तीन तासांच्या अथक प्रयत्नाने आग विझवण्यात यश आले आहे.

प्राथमिक अंदाजानुसार शॉर्ट सर्किटमुळे लागलेल्या आगीत, रेकॉर्ड रुम, युपिएस रुम, चेक व लॉकर रुम, लोन विभागातील कागदपत्रांचे आगीमुळे मोठे नुकसान झाले असल्याचे समजून येत आहे. आग लागल्याचे समजताच पेणच्या तहसिलदार स्वप्नाली डोईफोडे, पोलीस निरिक्षक देवेंद्र पोळ, नगरपालिकेचे अधिकारी राजाराम नरुटे, बँकेचे कर्मचारी, स्थानिक तरुणांनी घटनास्थळी त्वरित धाव घेत आग विझवण्यास मदत केली.




## सर्व पक्षीय शिवप्रेमी संघटनेने पुकारलेल्या बंदला कर्जतकरांचा उत्स्फूर्त पाठिंबा

**दै.रायगड नगरी । कर्जत**

राज्याचे राज्यपाल भगतसिंग कोश्यारी आणि भाजपच्या अन्य नेत्यांनी छत्रपती शिवाजी महाराज्यांबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य केल्या होते. त्यांचा निषेध करण्यासाठी शिवप्रेमी नागरिक व विविध संघटनांनी पुकारलेल्या कर्जत बंद ला सकल मराठा समाज कर्जतच्या वतीने जाहीर पाठिंबा देण्यात आला होता. हा बंद अभूतपूर्व यशस्वी झाला असून कर्जतच्या व्यापाऱ्यांनी उत्स्फूर्त पाठिंबा दिला.




निषेध करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज स्मारका जवळ सर्व शिवप्रेमी संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित झाले होते. शिवरायांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. त्यानंतर राज्यपाल भगतसिंग कोश्यारी, मंगलप्रभात लोढा, सुधांशु त्रिवेदी, रावसाहेब दानवे, विनोद तावडे, प्रसाद लाड यांनी छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल आक्षेपार्ह वर्तन केल्या बद्दल या सर्वांचा जोरदार घोषणा देऊन निषेध केला. 'राज्यपाल हटाव' चा नारा देत घोषणांनी परिसर दणाणून टाकला.

इतिहासाचे अभ्यासक वसंत कोळंबे, माजी सरपंच मधुकर घारे, माजी नगराध्यक्ष राजेश लाड, शंकर थोरवे, अनिल भोसले, दिपक भालेराव आदींनी आपल्या मनोगता-तून शिवरायांबद्दल आक्षेपार्ह वक्तव्ये करणाऱ्या राज्यपाल कोश्यारी आणि अन्य नेत्यांचा जाहीर निषेध केला. त्यानंतर बाजारपेठेतून निषेध फेरी काढून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन केले आणि तेथेही जाहीर निषेध व्यक्त करण्यात आला. शिवप्रेमी संघटनांनी पुकारलेल्या बंदला कर्जत मधील व्यापाऱ्यांनी शंभर टक्के बंद ठेऊन उत्स्फूर्त पाठिंबा दिला.

या प्रसंगी माजी सभापती प्रदीप ठाकरे, अनिल भोसले, जगदीश ठाकरे, सोमनाथ पालकर, रत्नाकर बडेकर, सोमनाथ ठोंबरे, ज्ञानेश्वर भालीवडे, मुकेश पाटील, संतोष पाटील, संतोष थोरवे, भानुदास मिसाळ, अंकुश मोधळे, रवी मोधळे, कैलास म्हामले, सुहास वांजळे, अरुण देशमुख, केशव वांजळे, नैनेश दिघे, मनोज लाड, निखिल लाड, प्रमोद लाड, ऍड. भाऊ मोरे, शेखर शहासने नदिम खान, अमीर मणियार, संजय धामनसे आदी शिवप्रेमी उपस्थित होते.

# भूकमुक्तीचा अपुरा लढा

भारतातील न्यायव्यवस्था देशातील गरिबी आणि उपासमार या प्रश्नांची वारंवार संवेदनशीलतेने दखल घेते. नोकरशाहीला आणि विविध सरकारांना वेळोवेळी सल्ले देते. काही सूचना करते. असे असूनही आजपर्यंत भारतातील उपासमारीचा प्रश्न पुरता सुटला आहे, असे म्हणता येत नाही. सर्वोच्च न्यायालयासमोर हा प्रश्न पुन्हा एकदा स्थलांतरित आणि असंघटित मजुरांच्या निमित्ताने आला आणि खंडपीठाने पुन्हा एकदा 'देशाला कुणालाही उपाशी झोपावे लागू नये,' ही केंद्र सरकारची जबाबदारी असल्याचे सूचित केले आहे. शेवटी न्यायालये सरकारकडूनच अपेक्षा करणार आणि सरकार नावाच्या व्यवस्थेचा दिल्ली ते गल्ली असा प्रचंड मोठा डोलारा प्रत्यक्षात झडझडून हलल्याशिवाय उपासमारीची लढाई जिंकता येणे अशक्य आहे. देशात आज 'राष्ट्रीय अन्नसुरक्षा कायदा' आहे आणि या कायद्याचे उद्दिष्टच मुळात प्रत्येक भारतीयाला अन्नधान्य मिळणे, हे आहे. त्याचप्रमाणे, केंद्र सरकारने ई-श्रम हे पोर्टल तयार केले आहे. ते असंघटित आणि स्थलांतरित श्रमिकांसाठी आहे. या श्रमिकांना रोज रोजगार, काम किंवा रोजंदारीचे वेतन मिळणे शक्य नसते. करोना काळात अशा लक्षावधी श्रमिकांवर उपासमारीची वेळ आली होती. या पोर्टलवर बांधकाम, शेतीसहित जवळपास चारशे प्रकारची कामे करणाऱ्या मजुरांची नोंदणी होणे अपेक्षित आहे. केंद्र सरकारने ही सुविधा निर्माण केली. मात्र, या पोर्टलवर देशातल्या प्रत्येक मजुराची नोंद करणे आणि त्याला व त्याच्या कुटुंबाला पुरेसा रोजगार मिळतो आहे किंवा नाही, हे पाहण्याची जबाबदारी कुणाची? तेव्हा अशा प्रकारच्या पोर्टलच्या रूपाने एक फलाट निर्माण करणे, हे पुरेसे नाही, हेच सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारच्या लक्षात आणून दिले आहे. गरिबी आणि उपासमार या प्रश्नांवर सर्वोच्च न्यायालयात अनेक याचिका येत असतात. मागे एकदा अशा याचिकेच्या सुनावणीत गरिबी निर्मूलन, उपासमार, अन्नपुरवठा, जेवण या साऱ्या विषयांना स्पर्श करणाऱ्या १३० पेक्षा जास्त योजना केंद्र सरकारच्या विविध खात्यांच्या मार्फत चालविल्या जातात, असा तपशील न्यायालयात सांगण्यात आला होता. हा आकडा धक्कादायक आहे. या योजनांचे एकत्रिकरण आणि सुसूत्रीकरण करून आधी त्यांची संख्या कमी करण्याची गरज आहे. याचे कारण, इतक्या योजना म्हणजे त्या राबविणाऱ्या नोकरशाहीचे किती मोठे अवडंबर उभे असेल याची कल्पनाच केलेली बरी. गेल्या वर्षी दुसऱ्या एका याचिकेची सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने मोठ्या प्रमाणात देशभरात 'कम्युनिटी किचन्स' म्हणजे सामुदायिक आहारगृहे सुरू करण्याची सूचना केली होती. ही सूचना चांगली होती आणि तिचे केंद्र सरकारने स्वागतही केले होते. मात्र, नेहेमीची सरकारी लाल फीत ओलांडून अशा योजना यशस्वी करणे सोपे नसते. तेथे राजकीय इच्छाशक्ती लागते. भारतातील ही न्यायालयीन लढाई नवी नाही. भारतीय राज्यघटनेतील एकविसावे कलम हे प्रत्येक नागरिकाला 'जगण्याचा मूलभूत हक्क' प्रदान करते. हा हक्क प्रत्यक्षात यायचा असेल तर 'अन्नाचा मूलभूत हक्क' जगण्याच्या हक्कापासून वेगळा काढताच येणार नाही, अशी अत्यंत मूलभूत मांडणी करणारी याचिका 'पीपल्स युनियन फॉर सिव्हिल लिबर्टीज' या संस्थेने २००१च्या एप्रिलमध्ये सर्वोच्च न्यायालयात केली होती. न्यायालयाने हा युक्तिवाद मान्य केल्यामुळे प्रत्येक नागरिकाच्या अन्नाच्या मूलभूत हक्काचे संरक्षण करण्याची नैतिक आणि प्रत्यक्ष जबाबदारी केंद्र सरकारवर येऊन पडली. त्यातूनच, पुढच्या दोन दशकांमध्ये अनेक योजनांचा जन्म झाला. करोना काळात केंद्र सरकारने कोट्यवधी कुटुंबांना जो मोफत अन्नधान्यपुरवठा केला; तो म्हणजे अशा योजनांचा सर्वाधिक विस्तार होता. मात्र, करोना संपल्यानंतरही हा प्रश्न संपलेला नाही, हा मुद्दा या ताज्या सुनावणीत चर्चेला आला आहे. भारतात सरकारने कोणतीही लोकसेवेची योजना अमलात आणणे म्हणजे ती फसण्याची आणि त्यात भ्रष्टाचाराची कीड लागण्याची शक्यता सर्वाधिक. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने कम्युनिटी किचन्ससारख्या योजनेची अंमलबजावणी 'अक्षयपात्र'सारख्या सेवाभावी संस्थेकडे सोपविण्याची गरज आहे. 'अक्षयपात्र'ने गेल्या काही वर्षांमध्ये देशातील लाखो शाळकरी मुलांपर्यंत माध्यान्ह भोजन नेण्यात यश मिळविले आहे. काही अडचणी वगळता हे मॉडेल यशस्वी झाले आहे. आज १४ राज्यांमधील २० लाखांहून अधिक मुलांना स्वच्छ जेवण मिळते आहे. अशीच 'अक्षयपात्रे' देशभरात उभी केली तर सर्वोच्च न्यायालयाने लक्ष वेधलेला उपासमारीचा प्रश्न संपविणे अवघड नाही. आज भारत धान्य, फळे, भाज्या आणि दूध यांच्या उत्पादनाचे विक्रम करीत आहे. तरीही, लक्षावधी मुलांची पुरेशा व सकस अन्नाअभावी वाढ खुंटते आहे. श्रमिकांवर क्षयासारख्या रोगांचा घाला प्रतिकार शक्ती कमी पडल्याने वाढतो आहे. एकीकडे अमाप धान्य आणि दुसरीकडे उपासमार यांच्यातली दरी बुजविण्यासाठी दूरदृष्टी व कळकळ असणारा योजक हवा. ते काम मनात आणले तर केंद्र व राज्य सरकारे करू शकतात. त्यांनी ते केले तर सर्वोच्च न्यायालयात दर काही काळाने अशा याचिका कशाला येतील?

# चिर्ले- दास्तान, जासई - गव्हाण रस्त्याची दुरवस्था

**दै.रायगड नगरी । उरण**

सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अखत्यारीत असणाऱ्या- दास्तान फाटा ते चिर्ले ,जासई ते गव्हाण मार्गावर मोठ्या प्रमाणात अवजड वाहनांची रेलचेल असते. त्यामुळे सदर रस्त्याची दयनीय अवस्था झाली आहे. त्यामूळे अपघात होण्याची संभावना निर्माण झाली आहे.

जेएनपीए बंदराच्या अनुषंगाने आयात - निर्यातीसाठी तालुक्यातील विविध गावांच्या हद्दीत मोठमोठी गोदामे, एमटी यार्ड साकारण्यात आले आहेत. त्यातील बहुतांशी गोदामे ही सार्वजनिक बांधकाम खात्याच्या रस्त्याला लागून वसविण्यात आली आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ठेकेदार च्या माध्यमातून बनविण्यात आलेले रस्ते अवजड वाहतुनीच्या अनुषंगाने नसल्याने आणि रस्त्याचा दर्जा नसल्याने गोदामात येणाऱ्या मालाचे अवजड कंटेनर ट्रेलर वाहतुकीमुळेच रस्ताची दुरवस्था होत आहे.



सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून ठेकेदारामार्फत चिर्ले येथील रस्त्याची दुरुस्ती करण्यात आली होती.अतिवृष्टी आणि अवजड वाहतुकीमुळे रस्ताच शिल्लक राहिला नाही तर धोकादायक बनला असुन आजही हा रस्ता दुरुस्तीच्या प्रतीक्षेत आहे. तसेच चिर्ले ते दास्तान या दरम्यान रेल्वेच्या पुलाचे काम सुरू असल्याने आणि अवजड वाहतुकीमुळे या रस्त्यावर खड्ड्याचे साम्राज्य निर्माण झाले आहे. ठेकदारामार्फत पर्यायी रस्ता प्रवाशांच्या सेवेसाठी बनवायचा असताना रस्त्या बनविण्यात आलेला नसल्याची खंत व्यक्त होत आहे.

तर जासई फाटा- गव्हाण रस्त्याच्या दुरुस्ती साठी अनेकांनी आंदोलन ही केली आहेत. ह्या मार्गावर विविध कंपन्यांचे एम टी यार्ड अनेक क्रशर प्लांट असल्याने मोठी अवजड वाहतूक होत आहे. तसेच डोंगरावरून येणाऱ्या पाण्याचे योग्य प्रकारे नियोजन नसल्याने पावसाळ्यात सर्व पाणी रस्त्यावरच साचला जातो त्यामुळे हा मार्ग लवकर खराब होतो. आज ही या रस्त्यावर मोठं मोठे खडे निर्माण झाले आहेत कोणीही या रस्त्याला वाली उरला नाही अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. तरी सामाजिक कार्यकर्ते, लोकप्रतिनिधी, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी सदर रस्त्याच्या दुरुस्तीकडे लक्ष केंद्रित करावे अशी मागणी प्रवाशांकडून करण्यात येत आहे.

# जागतिक दिव्यांग सप्ताह निमित्त डॉ.न.मा.जाधव फाउंडेशनच्या बौद्धिक अक्षम विद्यार्थ्यांची जनजागृती रॅली

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवीन पनवेल येथील डॉ. न.मा. जाधव फाउंडेशन संचालित बौद्धिक अक्षम मुलांची विशेष शाळेतील विद्यार्थ्यांची दिनांक ८ डिसेंबर २०२२ रोजी दिव्यांग सप्ताह व बौद्धिक अक्षम दिनानिमित्त नवीन पनवेल येथे जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते या रॅलीचे उद्घाटन पोषण आहार पंचायत समिती अधीक्षक महेश खामकर यांच्या हस्ते करण्यात आले. सकाळी साडेनऊ वाजता रॅली ची सुरुवात शाळेतून करण्यात आली विद्यार्थी शिक्षकांनी दिव्यांगत्व विषयी



जनजागृती रॅलीचे फलक दर्शवीत व जनजागृती संबंधित घोषणा देत लोकांचे लक्ष वेधून घेतले विद्यार्थ्यांच्या पालकांच्या व शिक्षकांच्या हातामध्ये जनजागृती करणारे पोस्टर्स घेऊन जनजागृती करण्यात आली या विद्यार्थ्यांच्याच जनजागृती मध्ये पनवेल वाहतूक पोलीस विभागाने सहभाग घेऊन विद्यार्थ्यांच्या हातात सुरक्षित वाहतुकीच्या नियमांचे पोस्टर्स देण्यात आले होते तसेच रॅली सुरू झाल्यावर रॅली दरम्यान वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या वाहन चालकांना थांबून विद्यार्थ्यांच्या हस्ते गुलाब पुष्प व वाहतुकीच्या नियमांचे बॅनर दाखवून नियम कसे पाळा याबाबत सांगण्यात आले हेल्मेट कंपल्सरी वापरावे याबाबतचे विद्यार्थ्यां मार्फत आव्हान करण्यात आले. सदर रॅली दरम्यान आवश्यक ती खबरदारी व उपाय योजना शालेय प्रशासनाकडून करण्यात आल्या होत्या रॅलीत सहभागी नवीन पनवेल परिसरातील सेक्टर एक पासून सेक्टर ५ सेक्टर ३, व सेक्टर १/ एस शाळेजवळ येऊन जनजागृती रॅलीची सांगता झाली समाजातील प्रत्येक घटकांना दिव्यांगांच्या प्रति सहानुभूती न दाखवता त्यांना संधी देऊन त्यांचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी प्रेरित करणे आवश्यक आहे दिव्यांग व्यक्तींच्या समस्या समजावून घेता याव्यात याबाबत समाजात जनजागृती व्हावी अपंगांचे प्रश्न जाणून घेऊन त्यांना योग्य ती मदत मिळावी हा रॅली काढण्यामागील शाळेचा प्रमुख उद्देश होता. रॅली सहभागी झालेल्या शाळेतील विद्यार्थ्यांसाठी वरिष्ठ पोलीस अधिकारी संजय नाले यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल वाहतूक पोलीस विभागातर्फे मुलांना चॉकलेट व खाऊ चे वाटप करण्यात आले.

# जासई हायस्कूलमध्ये महापरिनिर्वाण दिन भक्ती भावाने साजरा

**दै.रायगड नगरी । उरण**

रयत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि.बा. पाटील ज्युनिअर कॉलेज दहागाव विभाग जासई, ता. उरण जिल्हा रायगड. या शैक्षणिक संकुलात ६ डिसेंबर हा दिवस भारतीय घटनेचे शिल्पकार, भारतरत्न, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन मोठ्या भक्तीभावाने संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून भारतीय मजदूर महासंघाचे राष्ट्रीय महामंत्री,शाळा व्यवस्थापन व विकास समितीचे अध्यक्ष, कामगार नेते सुरेश पाटील हे लाभले होते त्यांनी विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा शिका संघटित व्हा आणि संघर्ष करा हा संदेश तसेच त्यांच्या त्यागमय जीवनाची विद्यार्थ्यांना आपल्या मनोगतात ओळख करून दिली. या शैक्षणिक संकुलाचे प्राचार्य आणि रयत शिक्षण संस्थेचे लाईफ वर्कर अरुण घाग यांनी उपस्थित मान्यवरांचे विद्यालयाच्या वतीने हार्दिक स्वागत करून कार्यक्रमाचे प्रस्ताविक केले. विद्यालयाच्या प्रांगणात असणाऱ्या महापुरुषांच्या पुतळ्यांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून पूजन केले गेले. या कार्यक्रमासाठी उरण पंचायत समितीचे माजी सभापती नरेश घरत, कामगार नेते मधुकर पाटील, रघुनाथ ठाकूर, सुभाष घरत , बाबूराव मढवी, कामगार नेत्या श्रीमती मनीषाताई म्हात्रे व शिक्षण प्रेमी नागरिक उपस्थित होते . रयत सेवक संघाचे महाराष्ट्र समन्वयक नुरा शेख यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे बोधमय चरित्र विद्यार्थ्यांना सांगितले तसेच विद्यालयाच्या उपमुख्याध्यापिका पाटील एस. एस.यांनीही आपले मनोगत व्यक्त केले तसेच अनेक विद्यार्थ्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर भाषणे केली.


मे.पांडे साहेब

ॲड.राकेश दिघे

## जाहिर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी क.स्तर सो.यांचे कोर्टात

फौ.चौ.अर्ज नं.१३५८/२०२२

ने.ता.२९/१२/२०२२

कु.वाल्मिक राजू गांगुर्डे<br>
वय : वर्षे, व्यवसाय : नोकरी<br>
रा.तुराडे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

ग्रामसेवक / ग्रामविकास अधिकारी<br>
ग्रुप ग्रामपंचायत तुराडे,<br>
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

तमाम जनतेस या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, सदर अर्जदार कु.वाल्मिक राजू गांगुर्डे हा दि.०२/०१/२००३ रोजी मौजे : रा.तुराडे, ता.पनवेल, जि.रायगड येथील राहत्या घरी जन्म झालेला आहे. अर्जदार यांच्या कु.वाल्मिक राजू गांगुर्डे यांच्या जन्माची नोंद संबंधित ग्रामसेवक / ग्रामविकास अधिकारी ग्रुप ग्रामपंचायत ग्रामपंचायत तुराडे, ता.पनवेल, जि.रायगड यांस योग्य ते आदेश पारित करण्याकरिता अर्जदार सदरचे अर्ज मे.कोर्टात दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे मृत्यूदाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमांनी त्यांच्या लेखी हरकत जरुर कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांस त्यांचे विनंतीप्रमाणे मृत्यूदाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

**सही/- क.लिपीक फौ.न्याया., पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/- सहा.अधिक्षक फौ.न्याया., पनवेल**



## साईनिवास अपार्टमेंट को.ऑप.हौसिंग सोसा.मर्या.पनवेल

आरजीडी/पीडब्ल्यूएल/एचएसजी/(टीसी)/१६०७/२०००/२००१/दि.२१/११/२०००

प्लॉट नं.१४३२, प्रभु आळी, शिवाजी रोड, पनवेल-४१०२०६, जि.रायगड

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, साईनिवास अपार्टमेंट को.ऑप.हौसिंग सोसा.मर्या.पनवेल या संस्थेच्या पुर्नबांधणी कामासाठी नामांकित तज्ञ आर्किटेक प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंसीसाठी सिलबंद निविदा मागवित आहोत. सदर कामी निविदा १२/१२/२०२२ ते १९/१२/२०२२ पर्यंत खालील पत्यावर पाठविण्यात याव्यात किंवा खाली दिलेल्या नंबरवर संपर्क साधावा.

१) विजय काशिनाथ पाटील : ९३२३७८९५४६<br>
२) संतोष किसन सुतार : ९०२९१४१३१४<br>
३) जया कांडपिळे : ९८२०९९६५७१

**पत्ता : साईनिवास को.ऑप.सोसायटी, भारत बँके जवळ, प्रभु आळी, पनवेल, जि.रायगड, पिन नं.४१०२०६**

**सही/-<br>
साईनिवास अपार्टमेंट को.ऑप.हौसिंग सोसा.मर्या.पनवेल<br>
अध्यक्ष/सचिव/खजिनदार**


# पनवेल तालुक्यात सरपंचांच्या दहा जागांसाठी २४ उमेदवार रिंगणात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील दहा ग्रामपंचायतींसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची ६ सप्टेंबरपर्यंत मुदत होती. १० ग्रामपंचायतींच्या सरपंचपदांसाठी ४५ उमेदवारांनी उमेदवारी अर्ज दाखल केले होते. त्यापैकी २१ उमेदवारांनी अर्ज मागे घेतल्याने आता २४ उमेदवार रिंगणात राहिले आहेत. थेट जनतेतून सरपंचाची निवड होणार असल्याने चुरस वाढली आहे. ग्रामपंचायत सदस्यपदासाठी उमेदवारी अर्ज दाखल केलेल्या ७५ उमेदवारांनी आपले नामांकन मागे घेतले आहेत. त्यामुळे, आता १७९ उमेदवार रिंगणात आहेत.

पनवेल तालुक्यातील मुदत संपलेल्या दहा ग्रामपंचायतींसाठी निवडणूक प्रक्रिया राबवण्यात येत आहे. सरपंच थेट जनतेतून निवडण्यात येणार आहे.त्यामुळे, उमेदवारांची संख्या वाढली होती. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या दिवशी अर्ज मागे कोण घेतो याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. अखेर सरपंच पदासाठी २१ उमेदवारांनी अर्ज मागे घेतले. तर सदस्य पदातील ७५ उमेदवारांनी आपले नामांकन मागे घेतले आहे. तर प्रत्यक्षात सरपंच पदासाठी २४ उमेदवार रिंगणात आहेत. तर सदस्य पदासाठी १७९ उमेदवार आपली लढत लढणार आहेत.


मे.पांडे साहेब

ॲड.सागर गोंधळी

## जाहिर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी क.स्तर सो.यांचे कोर्टात

फौ.चौ.अर्ज नं.१३७९/२०२२

नि.नं.७/ड

ने.ता.०७/०१/२०२३

श्री.सुरज शिवराम धुळे<br>
वय : ३४ वर्षे, व्यवसाय : नोकरी<br>
रा.कोंबडभुजे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

ग्रामसेवक / ग्रामविकास अधिकारी<br>
ग्रुप ग्रामपंचायत तरघर,<br>
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

तमाम जनतेस या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, सदर अर्जदार यांचे काका कै.हरिश्चंद्र वामन धुळे ह्या दि.१६/१०/२०१७ रोजी मौजे : रा.कोंबडभुजे, ता.पनवेल, जि.रायगड येथील राहत्या घरी मृत्यू झालेला आहे. अर्जदार यांचे काका कै.हरिश्चंद्र वामन धुळे यांच्या मृत्यूची नोंद संबंधित ग्रुप ग्रामपंचायत तरघर, ता.पनवेल, जि.रायगड यांस योग्य ते आदेश पारित करण्याकरिता अर्जदार सदरचे अर्ज मे.कोर्टात दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे मृत्यूदाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमांनी त्यांच्या लेखी हरकत जरुर कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांस त्यांचे विनंतीप्रमाणे मृत्यूदाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

**सही/- क.लिपीक फौ.न्याया., पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/- सहा.अधिक्षक फौ.न्याया., पनवेल**



मे.सोनवलकर साहेब

ॲड.योगिता पाटील

## जाहिर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात

क्रि.एम.ए.नं.१३५०/२०२२

नि.नं.७/ड

ने.ता.१०/०१/२०२३

श्री.मोहम्मद उमर मोहम्मद अली मस्ते<br>
वय : ६५ वर्षे, धंदा : नोकरी<br>
रा.फ्लॅट नं.३०१, प्लॉट नं.८४/८५,<br>
ऊमैमा अपार्टमेंट, ३ रा मजला,<br>
पटेल मोहल्ला, जुमा मशिद मागे,<br>
ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६ — अर्जदार

विरुद्ध

विभाग अधिकारी<br>
पनवेल महानगरपालिका, पनवेल — सामनेवाला

यामधील अर्जदार श्री.मोहम्मद उमर मोहम्मद अली मस्ते वय : ६५ वर्षे, धंदा : नोकरी, फ्लॅट नं.३०१, प्लॉट नं.८४/८५, ऊमैमा अपार्टमेंट, ३ रा मजला, पटेल मोहल्ला, जुमा मशिद मागे, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६ यांचा जन्म दि.१५/१/१९५८ रोजी पनवेल, रायगड येथे झाला आहे. सदरकामी अर्जदार यांनी पनवेल येथील मे.न्यायालयात जन्माची उशिरा नोंद होवून जन्मदाखला मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

तरी या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदर जन्माच्या उशिरा नोंदबाबत कोणाची हरकत असल्यास जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत पनवेल येथील मे.न्यायालयात हजर राहून दखल घ्यावी अन्यथा त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

**सही/- क.लिपीक फौ.न्याया., पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/- सहा.अधिक्षक फौ.न्याया., पनवेल**



## जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल मौजे : बेलवली, ता.पनवेल येथील खालील वर्णनाची जमीन खरेदी करणार आहेत.

**मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे**<br>
**मौजे : बेलवली, ता.पनवेल, जि.रायगड**

| अ.क्र. | गाव | सर्व्हे नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) |
|---|---|---|---|
| १ | बेलवली | १६४/१ | ०-३९-४ |
| २ | बेलवली | १५७ | ०-५९-२ पैकी ०-३७-५ |
| ३ | बेलवली | १६५/२ | ०-४२-४ पैकी ०-२९-३ |
| | | एकूण | १-०६-८ |

सबब, सदर नोटीसीने कळविण्यात येते की, वरील मिळकतीमध्ये कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्कहित संबंधी गहाण, दान, बक्षिस, लीज, लीन, साठेकरार, तारण, कुळहक्क, खरेदी, विक्री अथवा तत्संबंधित कोणत्याही हक्काने अगर अन्य कुणासही हरकत घेण्याची असल्यास अशा संबंधित व्यक्तीने ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ८ दिवसांचे आत पुराव्यानिशी लेखी हरकत सादर कराव्यात.

सदर नोटीसीच्या मुदतीत अन्य कुणाचीही हरकत वगैरे न आल्यास माझे अशिल सदर मिळकत निर्विवेद असल्याचे समजून सदर मिळकत खरेदी करतील. त्यानंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि.०८/१२/२०२२<br>
ठिकाण : पनवेल

**सही/-<br>
ॲड.सतीश काळे<br>
३०६, गणेश टॉवर, मोठा खांदा,<br>
से-१७, न्यू पनवेल, रायगड<br>
मो.नं.९८८१७८९८८८**



## जाहिर नोटीस

तमाम लोकांस या नोटीसीच्या माध्यमातून कळविण्यात येते की, आमचे अशिल **नक्षत्र डेव्हलपर्स** यांनी खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडून म्हणजे श्री मधुकर अनंता पोपेटा, पार्वती महादेव पोपेटा, सुनिता मनोहर पाटील, सरीता दिपक नावडेकर, जयश्री महादेव पोपेटा उर्फ (शर्मीला सखाराम गडकरी), ईन्द्राबाई चांगदेव पोपेटा, महेश चांगदेव पोपेटा, गणेश चांगदेव पोपेटा यांचे सामाईक क्षेत्र यात विकसनाचा करार करण्याचे ठरविलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:-

**मौजे : शिलोत्तर रायचूर(सूकापुर), ता.पनवेल, जि.रायगड**

| अ.क्र. | गट नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|---|
| ०१ | ३९ | ० | ०-१७-७० पो.ख. ०-०१-३० एकुण ०-१९-०० | २.५३ |

सदरची मिळकत ही वरील मालकाची निर्वेध व मालकी हक्काच्या प्रत्यक्ष ताबेकब्जात वहिवाटीतील असून ती विकसन करण्याचा त्यांना हक्क व अधिकार असल्याने त्यांनी सदरच्या मिळकतीचे पुर्ण हक्क व हितसंबंधासह आमचे अशिलांना विकसन करण्यासाठी देणार आहेत.

तरी वर वर्णन केलेली मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, ताबा कब्जा, कुळहिवाट, गहाण, बक्षिसपत्र, चार्ज, लीज, अॅटॅचमेंट, लीन, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार व खालील दिलेल्या पत्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावे. मुदतीत कोणाचीही हरकत/तक्रार न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मालकाबरोबर विकसनाचा करार करतील. याची नोंद घ्यावी.

दि.०९/१२/२०२२<br>
ठिकाण : पनवेल

**सही/-<br>
ॲड. किशोर टोम्पे<br>
रुम नं.२१०,ए-विंग,सिम्फोनी को. हौ. सो.<br>
लि. प्लॉट नं.३१, सेक्टर -३, नवीन पनवेल.<br>
जिल्हा-रायगड पिन-४१०२०६.<br>
मो. नं. ९८२०३७३८२८**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# उरण तालुक्यातील १७ ग्रामपंचायतींच्या सरपंचपदासाठी ५३ उमेदवार

## तर १५१ सदस्यांच्या ३७१ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील १७ ग्रामपंचायतींच्या सरपंच पदासाठी विविध राजकीय पक्षांचे ५३ तर १७ ग्रामपंचायतीच्या १५१ सदस्य पदासाठी ३७१ उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात आ-हेत. उरण तालुक्यातील १८ ग्रामपंचायतीच्या निवडणुका जाहीर झाल्या आहेत.त्यापैकी घारा-पुरी ग्रामपंचायतीची निवडणूक बिनविरोध झाली आहे.

उर्वरित १७ ग्रामपंचायतींच्या सरपंच पदासाठी इच्छुकांचे एकूण १०५ उमेदवारी अर्ज दाखल झाले होते.

त्यापैकी ९८ उमेदवारी अर्ज वैध ठरले होते. यापैकी काल शेवटच्या दिवसापर्यंत ४४ उमेदवारांनी निवडणुकीतुन माघार घेतली आहे. त्यामुळे तालुक्यातील १७ ग्रामपंचायतींच्या सरपंच पदासाठी विविध राजकीय पक्षांचे एकूण ५३ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

तालुक्यातील १८ ग्रामपंचायतींच्या एकूण १६४ सदस्यपदासाठी ५५३ उमेदवारी अर्ज दाखल झाले होते.त्यापैकी छानणी नंतर ५४७ उमेदवारी अर्ज वैध ठरले होते.त्यानंतर त्यापैकी १६३ उमेदवारांनी उमेदवारी अर्ज मागे घेतले आहेत.त्यामुळे ३७१ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत.घारापुरी ग्रामपंचायतीची सरपंच, सदस्यांची निवडणूक याधीच बिनविरोध निवड जाहीर झाली आहे.

तर उमेदवारी अर्ज मागे घेतल्यानंतर तालुक्यातील नवघर- ४,पुनाडे- १,भेंडखळ -१ आणि घारापुरी सर्वच्या सर्व - ७ अशा एकूण १३ ग्रामपंचायतींच्या जागेवर सदस्य बिनविरोध निवडून आले असल्याची माहिती उरण तहसिलदार भाऊसाहेब अंधारे यांनी दिली आहे. चिर्ले ग्रामपंचायतीच्या ११ जागांसाठी सर्वाधिक ३४ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

त्यापाठोपाठ तालुक्यातील श्रीमंत समजली जाणाऱ्या जसखार ग्रामपंचायतीमध्ये ११ जागांसाठी ३१ तर नवीनशेवा ९ जागांसाठी ३१ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. तर या सरपंच व सदस्य पदाच्या उमेदवारांना निवडणूक चिन्हांचे वाटप करण्यात आल्यानंत र ठिकठिकाणच्या ग्रामपंचायतींमध्ये सरळ, तिरंगी, चौरंगी आणि बहुरंगी लढती होणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

# संक्षिप्त...

## ज्ञानकृपा सहकारी पतपेढीत रोख रकमेची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहरातील साई आर्केड शॉप नं ८, येथे असलेल्या ज्ञानकृपा सहकारी पतपेढी मर्यादितच्या पनवेल शाखेत अज्ञात चोरट्याने चोरी करून जवळपास ८७, ८८७/- रुपये रक्कम चोरून नेल्याची घटना घडली आहे.

पतपेढीच्या ऑफिसच्या खिडकीचे ग्रील वाकवून अज्ञात चोरट्याने आत प्रवेश करून पतपेढीच्या टेबलचे ड्रॉवरमधील ८७ हजार ८८७/- रुपये रोख रक्कम चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## बियर शॉपी दुकानातील कर्मचाऱ्याला मारहाण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

दुकानाच्या ठिकाणी बियर पिऊ नका असे सांगितल्याने त्याचा राग मनात धरून चार अनोळखी पैकी एकाने तेथील दोघांना लाकडी बांबू मारून तर इतर तिघांनी हाताने मारून दोघांना जखमी केल्याची घटना करंजाडे येथे घडली आहे.

जितेश बियर शॉपी या ठिकाणी अंकुश भोईर व त्याच्या साथीदाराने चार अनोळखी इसमांना दुकानाच्या ठिकाणी बियर पिऊ नका असे सांगितले. मात्र त्याचा राग मनात धरून चार अनोळखी पैकी एकाने तेथील त्या दोघांना लाकडी बांबू मारून तर इतर तिघांनी हाताने मारून दोघांना जखमी केल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## देवकान्हे-पिंपळवाडी येथे श्री.दत्त जयंती उत्सव भक्तीमय वातावरणात साजरा


**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहे तालुक्यातील देवकान्हे-पिंपळवाडी येथे सालाबादप्रमाणे याही वर्षी श्री.दत्त जयंती उत्सव सोहळा मोठ्या भक्तीभावाने साजरा करण्यात आला. रायगड भूषण गुरूवर्य ह.भ.प.पुरूषोत्तम महाराज पाटील,वाटावं यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली श्री.दत्तकृपा मंडळ पिंपळवाडी देवकान्हे यांच्या वतीने संपन्न करण्यात आलेल्या या कार्यक्रमप्रसंगी श्री.गुरूदेव दत्तात्रेय जन्मोत्सव, श्री.सत्यनारायणाची महाप-ूजा, महाआरती, सायं.६ ते ७ रोहा कोंकण दिंडी वारकरी सांप्रदाय यांचे हरिपाठ, तर रात्रौ.९ ते ११ ह.भ.प.दिनेश महाराज कडव(वांदोळी) यांची हरिकिर्तनरूपी आदी धार्मिक तथा अध्यात्मिक कार्यक्रम संपन्न आले.

## तळा कासारआळी येथे दत्त जन्मोत्सव साजरा

**दै.रायगड नगरी । तळा**

त्वष्टा कासार समाजाचे श्री दत्त मंदीर असून काल मार्गशिर्ष शुध्द (१४) चतुर्दशी व (१५) पौर्णीमा तिथी प्रमाणे दि.६ डिसेंबर रोजी मंदिराचा वर्धापन दिन व ७ डिसेंबर २२रोजी श्री दत्त जन्मोत्सव मोठ्या भक्तीभावाने श्रध्देने साजरा करण्यात आला. हा उत्सव गेली ३०वर्ष केला जात असून यानिमित्ताने काकड आरती, श्री दत्त पुजा, महाप्रसाद, सांय. तिर्थ प्रसाद, रात्रो.१०वा.श्री विठ्ठल रखूमाई प्रसादीक महिला भजन मंडळ भोईर वाडी.बुवा श्रीम.प्रगती रिसबूड सहकारी लक्ष्मण बुवा शिंदे यांचे संगीत भजन. दि.७ डिसेंबर



श्री दत्त जन्मोत्सव सकाळी अभिषेक आवर्तने पंचोपचारी पुजा सायं.५ ते ७ श्रीदत्त जन्मोत्सव निमित्ताने ह.भ.प.धनंजय गद्रे बुवा(पाली) यांचे किर्तन रात्रौ.१० भजन अशा भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन श्री दत्त सेवा मंडळ त्वष्टा कासार अध्यक्ष राकेश वडके, उपाध्यक्ष सुरेश मशेटे, सचिव अरूण मशेटे यांनी केले होते. यावेळी सर्व समाज बांधव, भाविक सहभागी होऊन मोठ्या भक्तिभावाने साजरा झाला.

## महापरिनिर्वाण दिनानिमित्त स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पक्षातर्फे भीम भक्तांना भोजनदान

**दै.रायगड नगरी । पनवेल**

स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पार्टीचे रायगड जिल्हा अध्यक्ष महेश साळुंखे यांनी भारतरत्न भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त पक्षातर्फे आयोजित भोजनदानाचा कार्यक्रम संपन्न केला.




पक्षाच्या वतीने मागील ३५ वर्षे राष्ट्रीय अध्यक्ष मनोज संसारे व युवा नेते अनिकेत संसारे यांच्या सहकार्याने सर्व भीम भक्तांना चैत्यभूमी येथे भोजनदान करण्यात येते. महेश साळुंखे यांनी दोन दिवस तेथील व्यवस्था यशस्वीरित्या पार पाडली. तसेच दत्त जयंती निमित्त त्यांनी विविध जयंती उत्सव मंडळांना भेटी दिल्या त्यावेळी त्यांचा सत्कार करण्यात आला. वडघर सेक्टर आर चार येथील मंडळाचे रोशन पाटील कुंभारवाडा पनवेल येथील मंडळाचे राजेश परदेशी कानिफनाथ मंदिर मंडळाचे प्रशांत गायकवाड आगरी समाज हॉल जवळील मंडळाचे प्रकाश घरात त्याचप्रमाणे तालुका पोलीस स्टेशन एम एस ई बी ऑफिस या ठिकाणी त्यांनी भेटी दिल्या व त्यांचा त्या ठिकाणी सत्कार करण्यात आला दरवर्षी एक जानेवारी रोजी भीमा कोरेगाव येथे शौर्य दिन साजरा करण्यात येतो. तसेच भीमा कोरेगाव येथे जाण्याची तयारी करण्याकरिता कार्यकर्त्यांच्या विभागवार बैठका महेश साळुंखे घेणार आहेत. या बैठकांमध्ये आगामी महानगरपालिका जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांविषयी चर्चा करण्यात येणार आहे.

## 'अभंगवाणी'ने श्रीदत्त जयंतीचा आनंद द्विगुणित

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सदगुरु वामनबाबा महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या भूमीत श्री नवनाथ सेवा मंडळ (योगीनगर, धोंडळी) यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या श्रीगुरुचरित्र पारायण सप्ताह व श्रीदत्त जयंती उत्सवात रायगड भूषण पंडित उमेश चौधरी यांच्या 'अभंगवाणी' या कार्यक्रमाने उत्सवाचा आनंद द्विगुणित झाला. हा कार्यक्रम सादर होत असताना बहारदार गायनाला रसिकांनी मनमुरादपणे दाद दिली.

तळोजा औद्योगिक क्षेत्रातील रामकी कंपनीच्या शेजारी असलेल्या श्रीस्वामी समर्थ मठ योगिनगर येथे आयोजित करण्यात आलेल्या या उत्सवात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्या अनुषंगाने पंडित उमेश चौधरी यांच्या 'अभंगवाणी' या सुरमयी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. संतांची भूमी असलेल्या महाराष्ट्राला संस्कृती आणि कलेचा वारसा आहे. त्यामुळे विविध क्षेत्रातील कलाकारांची मांदिआळी आहे. अशातच अनेक तप संगीत साधनेची सेवा करणारे गायक या भूमीला लाभले आहेत. त्याचप्रमाणे पंडित उमेश चौधरी गेल्या २० वर्षांहून अधिक काळ संगीत क्षेत्राची सेवा करीत आहेत. त्यांच्या गायनशैलीचे कौतुक सर्वत्र पहायला मिळते. असाच आणखी एक कार्यक्रम त्यांच्या आणि त्याच्या सहकाऱ्यांच्या वाणीतून सादर झाला. पंडित उमेश चौधरी यांनी प्रारंभी राग बिहाघ मधील ' जय जय रामकृष्ण हरी' त्यानंतर 'रूप सावळे सुंदर' आणि 'सुंदर ते ध्यान' हे अभंग सादर केले. तर गायिका कामिनी चौधरी यांनी भजनसम्राट पंडित निवृत्तीबुवा चौधरी यांनी संगीतबद्ध केलेले 'तुझी सेवा करीन मनोभावे' हा अभंग सादर करून श्रोत्यांची वाहवा मिळवली. तर गायक मंगेश चौधरी व अक्षय चौधरी यांनी 'मन मंदिरा' व 'कानडा राजा' हे अभंग गात कार्यक्रमात आणखी रंगत आणली. यावेळी वैभव चौधरी यांनी बहारदार सतारव-ादन केले. हार्मोनियमवर प्रख्यात हार्मोनियम वादक सीमा शिरोडकर यांच्या शिष्या भक्ती ब्रम्हे घैसास यांनी साथ दिली. तर पखवाजवर मधुकर धोंगडे, तबल्यावर मोहन देशमुख यांची सुमधूर तर साईड रिधमवर जगदीश म्हात्रे यांची साथ लाभली.तसेच या कार्यक्रमाला आदित्य पाटील यांचे सहकार्य लाभले. या कार्यक्रमासाठी मान्यवर म्हणून भाजपचे कल्याण डोंबिवलीचे माजी जिल्हा अध्यक्ष के. आर. जाधव, तळोजा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दत्तात्रेय किंद्रे, सिडको एम्प्लॉईज युनियनचे अध्यक्ष विनोद पाटील, सेक्रेटरी जे. टी. पाटील, खजिनदार दत्ता तांडेल, सदस्य व सनगर समाजाचे अध्यक्ष अनिल राऊत, सिडको आर्टिस्ट कम्बाईनचे अध्यक्ष सुधीर कोळी, समाजसेवक अनिल पाटील, यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, रसिक श्रोते, पंचक्रोशीतील ग्रामस्थ उपस्थित होते.


Pande Judge

Adv.Pratibha Patil

**PUBLIC NOTICE**

IN THE COURT OF JMFC PANVEL AT PANVEL

M.A.No.1376/2022
N.D.10/01/2023

Mrs.Reshma Kiran Torne — Applicant
V/s
Authorised Registrar
Wahal Grampanchyat
Wahal, Tal-Panvel, Dist-Raigad — Respodent

Whereas the above named applicant have file an application for Birth Certificate in respect of Her Son Tanush Kiran Torne Birth Dated 17/6/2020 who borned at Ulwe Navi Mumbai. However if any one has any objetion within 30 days from the date of publication of the public notice. if there is no objection from any one within the above period. then Court will proceed to pass necessary orders.

Given under my hands and seal of this court on ----- this day of 2022

Sd/- Jr.Clerk JMFC Panvel — Court Seal — Sd/- Asst.Superident. JMFC Panvel

---

मा.सोनावणे साहेब कोर्ट

ॲड.सुनील एन. मोरे

**जाहिर नोटीस**

पनवेल येथील मे.सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.८३०/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.१७/०१/२०२३

श्रीमती.स्वरांगी संतोष चिंदरकर
वय : ५२ वर्षे, व्यवसाय : घरकाम
रा.अे-१९/८, एस.बी.आय.कॉलनी, आर्मी कॉलनी,
सेक्टर-१३, नेरुळ, जि.ठाणे-४००७०६ — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार यांचे पती कै.संतोष भास्कर चिंदरकर हे दि.१७/०५/२०२० रोजी जनरल हॉस्पिटल, वाशी नवी मुंबई, येथील हॉस्पिटलमध्ये मयत झाले आहेत. तसेच अर्जदर यांची सासू कै.यशोदा भास्कर चिंदरकर या दि.०८/०९/२०२० रोजी मौजे : पाडागर, शिरगांव धोपटवाडी, देवगड, सिंधुदूर्ग येथे मयत झालेले आहेत. कै.संतोष भास्कर चिंदरकर यांच्या नावे खालील वर्णनाची मिळकत असून सदर मिळकत या सिडकोच्या अधिकार क्षेत्रात आहे. सदर मिळकती संदर्भात वारस दाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी मे.कोर्टात अर्ज केला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड येथील सिडको हद्दीतील रुम नं.-१२, प्लॉट नं.-सी-३, आकाशगंगा को.ऑप.हौसिंग सोसायटी लिमिटेड, सेक्टर-१५, कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड**

वरील मिळकती संदर्भात अर्जदार यांच्या नावाने वारस दाखला देण्याबाबत कुणाचीही हरकत असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत न्यायालयात सादर करावी. सदरच्या नोटीसीस मुदतीत हरकत न आल्यास वारस दाखला अर्जदारांच्या नावे प्रदान करण्यात येईल.

आज दि.८/१२/२०२२ रोजी कोर्टाच्या सही-शिक्क्याने दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

---

**जाहिर नोटीस**

आमचे अशिल श्री.पंकज कमलचंद सुराणा, रा. ए विंग, ३०२, मारुती सदन, गृहनिर्माण संस्था, फ्लॅट नं.४३, से.१०, खांदा कॉलनी, ता.पनवेल, जि.रायगड मो.नं.९८७०२००३५१ यांची ए-विंग, सदनिका क्र.३०२, या घराचे पवल ३०७/१/२६/२००१ अशा वर्णनाचा घराचा खरेदीखत करारनामा हे दि.१५/११/२०२२ रोजी १०.०० वाजताचे सुमारास शिवाजी चौक खांदा कॉलनी या परिसरात पायी चालत असताना कुठेतरी पडून गहाळ झालेला आहे. तरी सदर घराचा खरेदीखत करारनामा हा कोणा इसमांस सापडला असल्यास त्यांनी आमचे अशिल श्री.पंकज कमलचंद सुराणा यांना त्यांच्या नमूद पत्यावर रा.ए विंग, ३०२, मारुती सदन, गृहनिर्माण संस्था, फ्लॅट नं.४३, से.१०, खांदा कॉलनी, ता.पनवेल, जि.रायगड मो.नं.९८७०२००३५१ पोहच करावे.

पनवेल
दि.०८/१२/२०२२

सही/-
**ॲड.विजेंद्र नारायण मुंढे**
**(बी.ए., एल.एल.बी.)**
**पायोनिअर सोसायटी, स्वामी नित्यानंद रोड, तळमजला, ठाणा नाका, पनवेल**

---

मा.गुन्नाल साहेब यांचे कोर्ट

ॲड.अनिल सुभाष जाधव

**जाहिर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१८०१/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.१९/०१/२०२३

१) श्रीमती.मीना मंजीत सिंग अरोरा
वय : ५५ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.भाटीया हॉस्पिटल, ७६/७, ए.एम.जैन इस्टेट,
व्हिलेज रोड, भांडूप वेस्ट, मुंबई, महाराष्ट्र ४०००७८
२) सौ.गझल प्रशांत शेट्टी
वय : ३४ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.रुम नं.१०, २ रा माळा, प्लॉट नं.२८८,
बी.नं.२, बीएमसी, टेनेमेन्टस, संतोष हॉटेल मागे,
रावली कॅम्प, सायन कोळीवाडा मुंबई,
मुंबई महाराष्ट्र ४०००२२
३) सौ.अनमोल नितीन कौशिक
वय : २९ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.ई-१०२, नील रेसिडेन्सी-२, सी.एच.एस.,
प्लॉट नं.३४, ४८, ५१ नजदीक डी.ए.व्ही.,
पब्लिक स्कूल, सेक्टर-३, नवीन पनवेल ईस्ट,
पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड, महाराष्ट्र ४१०२०६ — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही

ज्याअर्थी अर्जदार क्रं.१ चे पती व अर्जदार क्रं.२ ते ३ यांचे वडील कै.मंजीत सिंग अरोरा हे दि.१६/०५/२०२२ रोजी दिल्ली हार्ट ॲण्ड लंग्झ हॉस्पिटल मेट्रो स्टेशन आर.के.आसाराम मार्ग-२, पंचकुई मार्ग नियर आ.के.४ ब्लॉक, डी आर्म भाग नवी दिल्ली पहार गंज सेंट्रल दिल्ली ११००५ येथे मयत आहेत. तसेच त्यांची मौजे : नवीन पनवेल / खांदा कॉलनी, ता.पनवेल, जि.रायगड येथे खालील वर्णनाची खुद्द मालकीची, नावे असलेली तसेच प्रत्यक्ष ताबेकब्जातील सदनिका आहे.

**मौजे : खांदा कॉलनी / नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**
सपना सोसायटी रजि नं.NBOM/CIDCO/HMG(OH)/316/JTR/1995-96

| मौजे | युनिट नं. | सेक्टर | प्लॉट नं. | सोसायटीचे नाव |
|---|---|---|---|---|
| नवीन पनवेल | १२ | ६ | सी-२० | सपना सोसायटी |

कै.मंजीत सिंग अरोरा यांच्या मिळकतीबाबत फायदे घेण्याकरिता अर्जदार यांस वारसदाखला मिळणे आवश्यक आहे. तसेच अर्जदार यांस वारसदाखला मिळणे कायद्याचे दृष्टीने योग्य व उचित आहे. सबब अर्जदार यांनी सदरचा अर्जात पॅरा नं.५ मध्ये नमूद केलेल्या मिळकतीबाबत कै.मंजीत सिंग अरोरा यांचे वारस असल्याबाबतचा वारसदाखला मिळवून घेण्याकरिता सदरचा अर्ज वारसदाखला मिळण्याकरिता मे.कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर वर नमूद केलेल्या मिळकती ह्या कै.मंजीत सिंग अरोरा यांचे वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारस दाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज दि.०८/१२/२०२२ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

---

**जाहिर नोटीस**

उपविभागीय अधिकारी पनवेल उपविभाग पनवेल यांच्या न्यायालयात

On admission आरटीएस अपिल क्र....../२०२२

१) श्री.बाळाराम दुनकूर पाटील
२) श्री.भगवान दुनकूर पाटील
३) श्री.सुकीर दुनकूर पाटील
१ ते ३ रा.तोंढरे, ता.पनवेल, जि.रायगड
४) रमाबाई अनंता पाटील
रा.पेंधर, ता.पनवेल, जि.रायगड
५) राधाबाई कमलाकर काठे
रा.नितळस, ता.पनवेल, जि.रायगड
६) कृष्णाबाई चंद्रकांत म्हात्रे
रा.सारडा, ता.उरण, जि.रायगड
७) कमलाबाई राजन ठाणे
रा.खारघर, ता.पनवेल, जि.रायगड — वादी
विरुद्ध
१) श्री.श्रीपत गोटीराम म्हात्रे
रा.पालेबुद्रुक, पो.पडघे, ता.पनवेल, जि.रायगड
२) श्रीमती.मुक्ताबाई राजाराम मढवी
रा.सिद्धी करवले, पो.तळोजे मजकूर, ता.पनवेल, जि.रायगड
३) श्रीमती.हिराबाई बाळाराम म्हात्रे उर्फ फडके
रा.ढोंगऱ्याचा पाडा, ता.पनवेल, जि.रायगड
४) श्रीमती.ताई नागा जोशी
रा.कानपोली, ता.पनवेल, जि.रायगड
५) श्री.गोविंद गोटीराम म्हात्रे
रा.पालेबुद्रुक, ता.पनवेल, जि.रायगड — प्रतिवादी

तमाम जनतेस तसेच सामनेवाले यांना या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ नुसार मौजे : तोंढरे, ता.पनवेल, जि.रायगड येथील फेरफार नोंद क्र.२०४८ विरुद्ध अर्जदार यांनी या न्यायालयात प्रस्तुतचे अपिल दाखल केलेले आहे. सदर अपिलामध्ये वेळोवेळी सुनावणी घेण्यात आलेल्या आहेत. प्रस्तुत अपिलाच्या सुनावणीकामी सामनेवाले या न्यायालयात सुनावणीकामी हजर झालेले नाहीत. सदर अपिलाची पुढील सुनावणी ही दि.२२/१२/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता निश्चित करण्यात आली आहे.

सबब या जाहीर नोटीशीद्वारे सामनेवाले यांनी तसेच वरील जमीन मिळकतीशी सबंधित असलेल्या व्यक्तींनी २१ दिवसांच्या आत उपविभागीय अधिकारी कार्यालय पनवेल, जि.रायगड येथे समक्ष येवून आवश्यक त्या सबळ कागदोपत्री पुराव्यासह लेखी म्हणणे दाखल करावे. सदर विहित केलेल्या मुदतीनंतर कोणाचीही व कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

**जमीन मिळकतीचे वर्णन**
**मौजे : तोंढरे, ता.पनवेल, जि.रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.प्र. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| ४९ | ३ | ०.२३.५० | ४.७५ |
| २ | २ | ०.४२.४० | ८.६९ |
| ९० | २/अ/१ | ०.२१.५० | २.५० |
| ६१ | २ क | ०.०६.५० | १.५६ |
| ६१ | २/फ | ०.०१.५० | ०.३४ |

सदरची जाहीर नोटीस आज रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिली.

ठिकाण : पनवेल
दिनांक : /११/२०२२

सही/-
**उप विभागीय अधिकारी उपविभाग पनवेल**

---

अर्जदारतर्फे वकील ॲड.शुभांगी केदार लाड

**जाहिर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश साहेब, वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१७८८/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.१७/०१/२०२३

कै.मनीबाई शंकर पुजारी (कातकरी) मयत यांचे वारस
१) अनंता शंकर पुजारी (कातकरी)
वय : ७५ वर्षे, धंदा :
रा.मु.सांगटोली, पो.वाजे, ता.पनवेल, जि.रायगड
२) शांताराम शंकर पुजारी (कातकरी) मयत तर्फे वारस
२/१) पार्वती शांताराम पुजारी (कातकरी)
वय : ६० वर्षे, धंदा : गृहिणी
२/२) सतीश शांताराम पुजारी (कातकरी)
वय : ३५ वर्षे, धंदा :
२/१ ते २/२ रा.मु.सांगटोली, पो.वाजे,
ता.पनवेल, जि.रायगड
३) बाळाराम शंकर कातकरी मयत तर्फे वारस
३/१) शोभा बाळाराम कातकरी
वय : ५० वर्षे, धंदा : गृहिणी
३/२) समीर बाळाराम कातकरी
वय : ३२ वर्षे, धंदा :
३/३) मनोहर बाळाराम कातकरी
वय : २८ वर्षे, धंदा :
३/१ ते ३/३ रा.खानावळे वाडी, पो.पोयंजे,
ता.पनवेल, जि.रायगड
४) रेउबाई काशिनाथ कातकरी
वय : ६० वर्षे, धंदा : गृहिणी
रा.वाजे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाले

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, कै.मणीबाई शंकर पुजारी (कातकरी) यांचा मृत्यू दि.१२/०५/१९९५ रोजी मु.सांगटोली, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झालेल्या आहेत. कै.मणीबाई शंकर पुजारी (कातकरी) यांच्या खालील मौजे : रोडपाली, ता.पनवेल, जि.रायगड येथील जमीन मिळकती बाबत.

**जमीन मिळकतीचे वर्णन**
**मौजे : रोडपाली, ता.पनवेल, जि.रायगड येथील**

| केस नंबर | सर्व्हे/ हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | पात्रता चौ.मी. | भूधारकाचे नाव | ॲवार्ड प्रमाणे नुकसान भरपाईची रक्कम रुपये पैसे |
|---|---|---|---|---|---|
| | ३०७ | ० | १८० चौ.मी. | कै.कुश्या लक्ष्या कातकरी | ३३१.२० |

सबब वरील जमीन मिळकती संदर्भात अर्जदार यांना वारस दाखला मिळणे करिता या मे.न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदार यांना वारस दाखला देण्याबाबत कुणाची कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास सदरची ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत न्यायालयात योग्य त्या कागदपत्रकासह सादर करावी. मुदतीत हरकत न आल्यास अर्जदारांकडून कायदेशीर साक्षी पुरावे नोंदवून अर्जदार यांना वारस दाखला प्रदान करण्यात येईल याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

आज दि.८/१२/२०२२ रोजी कोर्टाच्या सही शिक्क्याने दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

# कशेळे व्यापारी खून प्रकरणी स्थानिक दोन तरुणांना अटक

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत तालुक्यातील कशेळे येथील राजेंद्र ज्वेलर्सचे मालक हरीश तथा हरिसिंह राघोसिंह राजपूत यांचा ३ डिसेंबर रोजी खून झाला होता. त्या खून प्रकरणी पोलिसांनी स्थानिक सावळे गावातील दोन तरुणांना पोलिसांनी अटक केली आहे. या खून प्रकरणातील अन्य तीन ते चार आरोपी फरार असून त्यांचा शोध नेरळ पोलीस घेत असून रायगड पोलिसांच्या स्थानिक गुन्हे अन्वेषण विभाग तसेच कर्जत, खालापूर, रोहा पोलीसांच्या पथकांनी नेरळ पोलिसांना गुन्हा उघड करण्यासाठी मदत केली. अशी माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी विजय लगारे यांनी पत्रकार परिषद आयोजित करून पत्रकारांना दिली.

३ डिसेंबर रोजी कशेळे – नेरळ रस्त्यावर रात्री वाकस पुलाजवळ अपघात झाला होता. त्या अपघातात मृत्युमुखी पडलेले कशेळे येथील राजेंद्र ज्वेलर्स चे मालक हरीश राजपूत यांचा अपघाती मृत्यू नसून परिस्थितीजन्य पुरावे लक्षात घेता त्यांचा मृत्यू घातपात करून खून झाला असल्याचा गुन्हा नेरळ पोलीस ठाणे येथे ४ डिसेंबर रोजी दाखल झाला होता. त्यानंतर पोलिसांच्या अनेक टीम या खून प्रकरणाचा तपास करीत होते आणि त्यात रायगड पोलीस ची गुन्हे अन्वेषण विभागाचे टीम तसेच नेरळ पोलिसांच्या टीम ल कर्जत पोलीस आणि खा–लापूर तसेच रोहा येथील उपविभागीय अधिकारी



यांची पथके मदत करीत होती. पोलिसांनी आपल्या कौशल्याने या खुनाचा तपास लावला असून कशेळे ये घटनास्थळ या भागात कुठेही सीसीटिव्ही कॅमेरे नव्हते. केवळ राजेंद्र ज्वेलर्सचे दुकानासमोर असलेल्या कॅमेरे मध्ये २९ नोव्हेंबर पासून काही व्यक्ती रेकी करीत फिरत असल्याचे पोलिसांच्या लक्षात आले.

त्यानुसार तपास सुरू झाला होता.अप्पर जिल्हा पोलिस अधीक्षक अतुल झेंडे यांनी घटना स्थळी जावून तपासी अधिकारी आणि टीम ला मार्गदर्शन केले होते. तपासी अधिकारी नेरळ पोलीस ठाण्याचे निरीक्षक राजेंद्र तेंडुलकर, सहायक पोलीस निरीक्षक हनुमंत पवार, पोलीस उपनिरीक्षक श्रीकांत काळे तसेच स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलिस निरीक्षक दयानंद गावडे, पोलीस उप निरीक्षक कदम यांच्या पथकाने हा तपास योग्य दिशेने नेत कशेळे गावात मेकनिक चे दुकान असलेला एक तरुण आणि त्याचा सावळे गावातील मित्र अशा दोघांना या खून प्रकरणी ७ डिसेंबर रोजी चौकशी साठी ताब्यात घेण्यात आले होते. त्यांच्या कडून खुनाची माहिती मिळाल्यानंतर नेरळ पोलिसांनी सावळे गावातील त्या दोन्ही तरुणांना या गुन्ह्यात रात्री अटक केली आणि त्या दोघांना आज न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

अटक करण्यात आलेल्या आरोपी ची पूर्वी वसई आणि आता सोलापूर येथे राहत असलेल्या छगन राम पटेल याच्यासोबत असलेल्या ओळखी मधून या खुनाचा प्लॅन करण्यात आला होता. पटेल हा सावळे गावाचा जावई असून त्यांचे आणि अटक करण्यात आलेल्या दोन्ही तरुणांचे चांगले संबंध होते. त्यातून गुन्हेगारी प्रवृत्तीच्या छगन पटेल ने काही काम असल्यास गेम वाजवता येईल असे सांगितले होते. त्यानुसार त्या सर्वांनीच २९ आणि ३० नोव्हेंबर रोजी कशेळे येथे राजेंद्र ज्वेलर्स या दुकानाची रेकी केली होती.त्यानंतर छगन पटेल याने सापळा रचला आणि प्लॅन नुसार सावळे गावातील एका तरुणाला पत्नीची सोन्याची गंठण गानवठ ठेवून दोन लाख रुपये उलचण्याचा प्लॅन केला होता.हा प्लॅन त्या सावळे गावातील तरुणाने ३ डिसेंबर रोजी केला आणि रात्री संबंधित व्यापारी घरी जाण्यासाठी नेरळ स्टेशन कडे जात असताना त्याला लुटण्याचा इरादा करून सावळे गावातील एक तरुण कशेळे येथून हरीश राजपूत यांचा पाठलाग करीत आला होता. त्यानंतर वाकस गावाच्या अलीकडे त्याने तेथे दबा धरून बसलेल्या झायलो गाडी मधील लोकांना हरीश राजपूत यांना दाखवले. त्यानंतर राजपूत यांच्या बाईक च्या मागे झायलो असा पाठलाग सुरू होता. शेवटी वाकस पुलाच्या पुढे वळणावर जिते गावाच्या हद्दीत झायलो गाडीने राजपूत यांच्या गाडीला धडक दिली. त्यानंतर पटेल आणि त्याचे सहकारी यांनी राजपूत यांच्या कडील बॅग हिसकावून घेण्याचा इराद्याने चाकूने वार केले. राजपूत हे मजबूत शरीर यष्टी चे असल्याने ऐकत नसल्याने शेवटी त्यांचा धारदार शस्त्राने वार करून खून करण्यात आला होता. राजपुत यांच्या पोटात १२ ठिकाणी तर मानेवर आणि पायावर गुडघ्याजवल वार करण्यात आले होते.खून करून ते पुन्हा कशेळे रस्त्याने पळून गेले होते.

## संक्षिप्त...

### देशी विदेशी मद्यसाठा गुन्हे शाखा कक्ष २ पनवेलने केला हस्तगत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल रेल्वे स्टेशन परिसरात उघड्यावर देशी विदेशी मद्यसाठा विक्री करणाऱ्या एका इसमावर गुन्हे शाखा कक्ष २ पनवेल ने कारवाई करून त्याच्या कडून मुद्देमाल हस्तगत केला आहे.

शहरातील पनवेल रेल्वे स्टेशन, एनएमएमटी बस थांब्याच्या जवळ फुटपाथ लगत असलेल्या झाडाखाली एक इसम देशी विदेशी मद्यसाठा विक्री करण्याच्या उद्देशाने बेकायदेशीररित्या जवळ बाळगत असल्याची माहिती गुन्हे शाखा कक्ष २ पनवेल चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र पाटील यांना मिळताच त्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक वैभव रोंगे, पोहवा गडगे, पोहवा इंद्रजित कानू व त्यांच्या पथकाने छापा टाकून आरोपी रोशन सय्यद (वय ३६) याला ताब्यात घेऊन त्याच्या कडून देशी विदेशी १३६० रुपये किमतीचा ऐवज हस्तगत केला आहे.

### अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका अल्पवयीन मुलीवर लिफ्टमध्ये लैगिक अत्याचार केल्याची घटना तळोजा फेज एक येथे घडली आहे.

आरोपी अख्तर मातहर हुसेन याने एक अल्पवयीन मुलगी खेळण्यासाठी गेली असताना त्याने सदर मुलीला लिफ्टमध्ये घेऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याने याबाबतची माहिती सदर मुलीने आपल्या कुटुंबियांना देताच मुलीच्या कुटुंबीयांनी त्वरित याबाबतची तक्रार तळोजा पोलीस ठाण्यात केली आहे.

### विनापरवाना खाद्य पदार्थ विक्री करणाऱ्यांवर कारवाई

**दै.रायगड नगरी । पनवेल**

करंजाडे वसाहतीमध्ये उघड्यावर विनापरवाना खाद्यपदार्थ विक्री करणाऱ्यांवर दोघे विक्रेत्यांवर पनवेल शहर पोलिसांनी कारवाई केली आहे.

करंजाडे सेक्टर आर ३ या ठिकाणी उघड्यावर फ्राईड राईस विक्रीसाठी फुटपाथवर टेबल लावून त्यावर शेगडी ठेवून ते सिलेंडरच्या सहाय्याने पेटवून विक्री करणाऱ्या विरोधात पनवेल शहर पोलिसांनी कारवाई केली आहे.

तसेच चायनीज भेळ विक्रीसाठी फुटपाथवर टेबल लावून त्यावर शेगडी ठेवून ते सिलेंडरच्या सहाय्याने पेटवून विक्री करणाऱ्या विरोधात पनवेल शहर पोलिसांनी कारवाई केली आहे.

यामुळे अश्याप्रकारे उघड्यावर खाद्यपदार्थ विक्री करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहे.


**वाचकांना विनम्र सूचना**

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.


## तुफैल दामाद यांची रायगड जिल्हा डायरेक्ट व्हॉलीबॉल असोसिएशनच्या मुरुड तालुका डायरेक्टर पदी निवड


**दै.रायगड नगरी । कोर्लई**

क्राईम इन्व्हेस्टिगेशन बोर्ड (दिल्ली) महाराष्ट्र सचीव, वाहतूक सुरक्षा दल, नागरिक संरक्षक (आर.एस.पी.) संघटनेचे उपसमादेशक, राष्ट्रीय हिंदी समाचार पत्राचे सदस्य,व्हेंचर फाऊंडेशनच्या राष्ट्रीय सल्लागार तथा टायगर फोर्सचे मुरुड तालुका अध्यक्ष तुफैल दामाद यांची रायगड जिल्हा डायरेक्ट व्हॉलीबॉल असोसिएशनच्या मुरुड तालुका डायरेक्टरपदी निवड करण्यात आल्याबद्दल सर्वत्र कौतुक व समाधान व्यक्त होत आहे.

रायगड जिल्हा डायरेक्ट व्हॉलीबॉल कार्यकारिणीची सभा रेवदंडा येथे मोठ्या जल्लोषात प्रसाद गोंधळी यांच्या रिसॉर्टवर कार्यवाह दीपक मोकल, प्रफुल्ल मोरे, प्रसाद गोंधळी, किशोर राठोड मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडली. त्यावेळी ही निवड करण्यात आली.

मुरुड शहरासह तालुक्यात सामाजिक राजकीय व शैक्षणिक क्षेत्रात गेल्या तीन–चार वर्षांपासून व्हेंचर फाऊंडेशन मध्ये महाराष्ट्र महासचीव, जिल्हा उपाध्यक्ष पदी, वाहतूक सुरक्षा दल व नागरिक संरक्षण (आर.एस.पी.) संघटनेमध्ये व एक वर्षांपासून टायगर फोर्स संस्थेच्या माध्यमातून त्यांनी आपले योगदान दिले आहे.

व्हेंचर फाऊंडेशनच्या माध्यमातून कोरोना महामारीत आपली व आपल्या कुटुंबियांची पर्वा न करता अविरतपणे रुग्णसेवा देणा–या डॉक्टर्स, परिचारिका, होमगार्ड, शिक्षक, आर. एस.पी. पदाधिकारी, पथक अधिकारी,हॉटेल व्यावसायिक, होमगार्ड तसेच मुरुड तहसीलदार, महसूल विभाग व पुरवठा अधिकारी, कर्मचारी यांच्या अविरत सेवेची दखल घेऊन त्यांना मेडल व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात तसेच गोरगरीब आदिवासी बांधवांना ब्लँकेटचे वाटप तसेच तालुक्यातील नांदगाव,शिघ्रे व मुरुडमध्ये मोफत आरोग्य तपासणी व औषधोपचार शिबिर आदी कार्यक्रमात तुफैल दामाद यांची महत्त्वाची भूमिका होती.त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन रायगड जिल्हा डायरेक्ट व्हॉलीबॉल असोसिएशनच्या मुरुड तालुका डायरेक्टर पदी ही निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीचे संस्थेचे पदाधिकारी, अधिकारी, सदस्य, आप्तेष्ट, मित्र परिवाराकडून अभिनंदन व कौतुक होत आहे.



## माणगावमध्ये जागतिक दिव्यांग अपंग दिन मेळावा मोठ्या उत्साहात साजरा



**दै.रायगड नगरी । माणगाव**

माणगांव प्रहार दिव्यांग (अपंग) क्रांती संघटनेच्या वतीने जागतिक दिव्यांग (अपंग)दिन मेळावा हा दि ३ डिसेंबर रोजी माणगांव कुणबी भवन येथे होणार होता परंतु या दिवशी ना.बच्चू भाऊ कडू यांनी मंत्रालयात येथे कार्यक्रमाचे आयोजन केले असल्यामुळे हा कार्यक्र प्रहार दिव्यांग (अपंग) क्रांती माणगांव तालुका यांच्या वतीने रद्द करून हा कार्यक्रम बुधवार दि.७ डिसेंबर २०२२ रोजी सकाळी ठिक १०.०० वाजता कुणबी भवन येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

यावेळी माणगांव प.स.चे गटविकास अधिकारी वाय.एम.प्रभे, माणगांव उपजिल्हा रूग्णालयाचे डॉ.सचिन गोमसाळे, कृषी अधिकारी अशोक मारकड, माणगांव आगार व्यवस्थापक चेतन देवधर, रायगड जिल्हा अध्यक्ष सुनिल घडमोडे, रायगड जिल्हा महिला अध्यक्क्षा कु.रमाताई चौगले, रायगड जिल्हा कार्यध्यक्ष रविंद्र सांगले, माणगांव ता अध्यक्ष राजेंद्र आण्णा पांचाळ,माणगांव ता.महिला अध्यक्ष रेश्माताई मोरे, माणगांव ता.उपध्यक्ष नितेश मिरगुळे, माणगांव ता. सचिव इमरान जालगांवकर, माणगांव तालुका सहसचिव अमोल पांगारे, यावेळी उपस्थित होते.

यावेळी माणगांव प.स.चे गटविकास अधिकारी वाय एम प्रभे तसेच माणगांव तालुका उपजिल्हा रूग्णालयाचे डॉ.सचिन गोमासळे यांनी बोलताना सांगितले की दिव्यांगाना शासनाने ज्या ज्या योजना दिल्या आहेत त्या सर्वपरी आम्ही देण्याचा प्रयत्न करू. तसेच या कार्यक्रमा प्रसंगी मा.व्यवस्थापक एल.जी.पी.एल पेपर इंडस्ट्रीज प्रा.लि.विले भागाड एम.आय.डी.सी. यांच्याकडून दिव्यांग विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप देखील करण्यात आले

## म्हसळा तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेसची सरशी

### ६ ग्रामपंचायती राष्ट्रवादीकडे तर १ ग्रामपंचायत उद्धव ठाकरे गटाकडे

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

म्हसळा तालुक्यात १३ ग्रामपंचायतीच्या निवडणुका जाहीर असून आज छाननी आणि चिन्हवाटपानंतर तालुक्यात तटकरे कुटुंबीय आणि राष्ट्रवादी काँग्रेसच राजकीयदृष्टया वरचढ आसल्याचे स्पष्ट झाले, बिनविरोध आलेल्या ७ग्रामपंचायतीपैकी तब्बल ६ ग्रामपंचायती निर्विवाद राष्ट्रवादीकडे तर एक ग्रामपंचायत शिवसेना (उद्धव ठाकरे ) गटाकडे आसल्याचे स्पष्ट झाले. १३ ग्रामपंचायतीच्या ९७ सदस्यांसाठी १२४ सदस्य रिंगणात, तर १३ थेटसरपंच पदासाठी ६ बिनविरोध,रेवली ग्रामपंचा यती साठीसरपंचपदासाठी अर्जच आला नाही तर अन्य ६ थेटसरपंच पदासाठी १४ अर्ज दारवल आहेत.

त्यामध्ये घोणसे आणि देवघर या दोन ग्रामपंचायतीत प्रत्येकी ३ उमेदार थेट सरपंचपदासाठी आपले नशीब आजमवणार आहेत .तोराडी,सणदेरी, लेप, तोंडसुरे या चार ग्रामपंचायतीतून थेटसरपंच पदासाठी प्रत्येकी दोन उमेदवार रिंगणात आहेत. निवडणुका नंतर १३पैकी ११ ग्राम पंचायती मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसची सत्ता प्रस्थापित होणार आसल्याचा राजकीय निरीक्षकां चा आंदाज आहे.काळसुरी, खरसई, निगडी,फळसप,कणघर या राष्ट्रवादी काँग्रेसकडे, तर कांदळवाडा ग्रामपंचायत ग्रामपंचायत शिवसेना (उबाठा) गटाकडे आली आहे, रेवली ग्रामपंचायती साठी सरपंचपदासाठी अर्जच आला नाही तर ३ प्रभागातून ७ सदस्य पदासाठी फक्त ६ अर्ज दाखल आहेत.


तालुक्यांतील १३ ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत १२ हजार ८३० मतदार प्रत्यक्ष निवडणूकीत सहभाग घेणार आहेत त्यामध्ये पुरुष ६१४८ , स्त्री ६६८२ मतदार आसल्याचे निवडणुक निर्णय आधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार गणेश तेलंगे यानी सांगितले. रवीवार दि.१८ डिसेंबरला मतदान होणार असून मंगळवार दि.२० डिसेंबरला निकाल जाहीर होणार आहे. असेही तेलंगे यानी सांगितले.

## अपघातात वाहनात अडकून पडलेल्या चालकाला वाचवण्यासाठी धावले 'देवदूत'

**दै.रायगड नगरी । खोपोली**

मुंबई–पुणे जुन्या महामार्गावर खोपोली शहरातील शिळफाटा येथे असलेल्या इंदिरा गांधी चौकातल्या पातळगंगा नदीवरील ब्रिजच्या कठड्याला धडकून टेम्पो (क्र.एम एच ०४, एचडी ८३०३) मध्ये चालक आस्वान मुस्तुफा (३०, रा. जम्मू काश्मीर) हा गंभीररित्या जखमी होऊन अडकून पडला होता. ही घटना दि. ८ डिसेंबर २०२२ रोजी पहाटे २.५० वाजेच्या दरम्यान घडली. खोपोली पोलीस स्टेशनचे पेट्रोलिंगचे कर्मचारी, महामार्गावरील देवदूत यंत्रणा, अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी सामाजिक संस्थेचे सदस्य यांनी कसोशीने प्रयत्न करून चालक आस्वान मुस्तफा याला बाहेर काढून एमजीएम हॉस्पिटल कामोठे येथे उपचारार्थ पाठविले.

चालक आस्वान मुस्तुफा हा पुण्याकडून मुंबईच्या दिशेने टेम्पो घेऊन निघाला होता. मुंबई–पुणे जुन्या महामार्गावर खोपोली एक्झिटने घाट उतरत असताना तीव्र उतारावर टेम्पोचे



ब्रेक फेल झाले, त्यामुळे त्याचे टेम्पोवरील नियंत्रण सुटल्याने इंदिरा गांधी चौकात असलेल्या पाताळगंगा नदीच्या ब्रिजवर असलेल्या सुरक्षा कठड्याला तोडत त्या ठिकाणी असलेल्या मोठ्या वृक्षाला धडकून थांबला. टेम्पोच्या केबिनच्या समोरील भागाचा चक्काचूर झाला आहे. केबिनमध्ये आस्वान मुस्तुफा हा अडकून पडला होता.

अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी टीमचे सदस्य त्या ठिकाणी पोचल्यानंतर खोपोली पोलीस स्टेशन आणि 'मुंबई–पुणे एक्सप्रेस वे'वरील देवदूत यंत्रणेच्या टीमला त्या ठिकाणी पाचारण केले गेले.

क्रेन, हायड्रोलिक कटर तसेच अन्य साधने वापरून चालक आस्वान मुस्तुफाला बाहेर काढण्यात आले. सर्वांच्या सहकार्याने रेस्क्यू ऑपरेशन यशस्वीरित्या पार पडले. अपघातग्रस्त टेम्पो बाजूला काढून वाहतूक सुरळीत करण्यात आली आहे.

### मुंबई राज्य उत्पादन शुल्क विभागाची धडक कारवाई

## मुंबई, पनवेल येथून रु.८ लाख ५७ हजार ८६० किंमतीचा मुद्देमाल जप्त

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

राज्य उत्पादन शुल्क आयुक्त डॉ.विजय सुर्यवंशी, राज्य उत्पादन शुल्क संचालक सुनिल चव्हाण, राज्य उत्पादन शुल्क कोकण विभाग ठाणे विभागीय उपायुक्त प्रसाद सुर्वे, राज्य उत्पादन शुल्क, मुंबई शहर अधीक्षक प्रविण कुमार तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य उत्पादन शुल्क, एच विभाग, मुंबई शहर निरीक्षक यांना रुम नं.२०५, दुसरा मजला, शितला देवी दर्शन, ११ वी गल्ली कामाठीपुरा मुंबई सेंट्रल, मुंबई या ठिकाणी बनावट विदेशी मद्य तयार केले जाते, अशी खात्रीशीर माहिती मिळाली. यानुसार राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथकाने दि.०५ डिसेंबर २०२२ रोजी छापा मारुन बनावट विदेशी मद्याच्या सिलबंद व रिकाम्या बाटल्या, भारतीय बनावटीच्या विदेशी मद्याच्या सिलबंद बाटल्या, मोबाईल व बनावट मद्य वाहतूक करुन विक्री करण्याकरिता वापरत असलेले दुचाकी वाहन असा एकूण अंदाजित किंमत रु. १ लाख ६४ हजार ६६० किंमतीचा मुद्देमाल जप्त केला.

या गुन्ह्यात आरोपी राज अशोक वाघेला, वय २० वर्षे यास ताब्यात घेऊन गुन्हा नोंद करण्यात आला. या आर–ोपीची अधिक चौकशी केली असता त्याने तपासादरम्यान दिलेल्या माहिती वरुन शॉप नं. १, मेगा नेक्सेस बिल्डींग, प्लॉट नं. ३०४, सेक्टर १९, उलवे, नवी मुंबई, पनवेल येथे छापा घालून रु.३ लाख ९६ हजार ४८० किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच दोन आरोपी रमेश परमेश्वर तियर, वय ३५ वर्षे व निशांत नारायण केके, वय ३० वर्षे यांनाही अटक करण्यात आली. हे दोन्ही आरोपींनी दिलेल्या माहितीच्या आधारे त्यांचे राहते घर क्र. ८१३, मु.पो.पाटणोली, ता.पनवेल, जि.रायगड येथे छापा घालून रु. २ लाख ९६ हजार ७२० किंमतीचा मुद्देमालही जप्त करण्यात आला. या तीनही आरोपींविरुद्ध महाराष्ट्र मद्य निषेध कायदा १९४९ चे कलम ६५ (अ) (ब) (क) (ड) (ई) (फ) ८१, ८३ व ९०, अन्वये अटक करुन गुन्हा नोंद करण्यात आला आहे. या गुन्ह्यात अंदाजित किंमत रु.८ लाख ५७ हजार ८६० किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

ही कारवाई राज्य उत्पादन शुल्क, एच विभाग, मुंबई शहर निरीक्षक श्री.जनार्दन खिल्लारे यांनी केली असून कारवाई दरम्यान राज्य उत्पादन शुल्क, आय विभाग, मुंबई शहर निरीक्षक आनंद पवार, दुय्यम निरीक्षक अमोल पराडकर, विनोद जाधव, श्रीमती श्रुती कानडे, श्रीमती प्रज्ञा राणे व सर्वश्री जवान योगेश यादव, विशाल रणपिसे, सचिन पवार, विलास चौधरी, विनोद अहिरे, जी.डी.पवार यांनी सहकार्य केले. गुन्ह्याचा पुढील तपास राज्य उत्पादन शुल्क, एच विभाग, मुंबई शहर निरीक्षक जनार्दन खिल्लारे करीत आहेत.

## महापालिका मुख्यालयात संत संताजी जगनाडे यांच्या जयंती निमित्ताने अभिवादन



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिकेच्या मुख्यालयात संत संताजी जगनाडे यांच्या जयंती निमित्ताने त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी उपायुक्त गणेश शेटे, उपायुक्त कैलास गावडे, सामान्य् प्रशासन विभाग प्रमुख दशरथ भंडारी, आस्थापना विभाग प्रमुख नामदेव पिचड, सचिव तिलकराज खापर्डे तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.